11

# कुळवाडी भूषण : राजा शिवछत्रपती

**प्रा. राजेश भालेराव**
संत जनाबाई महाविद्यालय, गंगाखेड.

भारत हा कृषी प्रधान देश आहे. आजही भारतातील बहुतांश लोक शेती हा व्यवसाय करतात. शेतीवर त्यांचे जीवन अवलंबून आहे. तसेच भारत हा कृषी अर्थव्यवस्था असलेला देश आहे. शिवाजी महाराजांच्या कालखंडामध्येही महाराष्ट्राचे शेती व्यवसायाशी संपूर्णपणे आर्थिक जीवन निगडित होते. स्वराज्याची कृषी व्यवस्था पुर्णत: पर्जन्यमानावर अवलंबुन होती. 'उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नौकरी' या नुसारच जनजीवन चालत असे. शेती हा जरी जीवन जगण्याचा मार्ग असला तरी शेती ही पारंपरिक पध्दतीनेच कसली जात होती. हिंदवी स्वराज्याच्या पाया रचनाऱ्या शिव छत्रपतीला शेतकऱ्यांचे जीवन व समस्यांची जाणीव होती. कारण ते स्वत: शहाजी या एका निजामशाहीतील उमरावाचे पुत्र आणि पुण्याचे जमीनदार होते. त्यांना शेतकऱ्यांचे प्रश्न माहीत होते म्हणून महाराजांनी आपल्या स्वराज्यात शेती विषयक सुधारणा करण्याचा क्रांतीकारी प्रयत्न केला. 'कुळवाडी भूषण पोवाडा गातो भोसल्याचा। छत्रपती शिवाजीचा'. कुळवाडी भूषण राजा शिवछत्रपती असे म.फुले आपल्या पोवाड्यात त्यांना संबोधतात ते यामुळेच.

स्वराज्यातील शेतकरी हा कुणबी, मुजेरी, कुळवाडी इ. नावानी ओळखला जाई. डॉ. अ. रा. कुलकर्णीच्या मते 'कुणबी' जात नव्हती. शेती व्यवसाय करणाऱ्या समाज समूहाला 'कुणबी' संबोधत. 'कुणबी' हा शब्द कुळंबी किंवा कुटुंबिक - कुटुम्बिन या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश होऊन तयार झाला आहे. श्री जेमीनि कडूच्या मते, 'कुळ' ह्या मूळ शब्दापासून पुढे कुळंबी, कुलंबी, कुंबी, कुणबी असा हा शब्द तयार झाला असावा. कुणबी, कुणबट, कुणभाऊ, कुळवाडी, इ. शब्दांचाही अर्थ शेतकरी होतो. म्हणून महाराजांना 'कुळवाडी भूषण' असे संबोधले जाते.

शेतीचा विकास साधन्यासाठी महाराजांनी एक निश्चित आराखडा रचून शेतकऱ्यांच्या विकासाचा प्रयत्न केला. "शेतकरी सुखी तर राजा सुखी, शेतकरी गरीब तर राजा गरीब आणि राजा गरीब तर राज्य गरीब" ही त्या काळची अर्थनिती होती. याची त्यांना जाणीव होती म्हणून त्यांनी शेतीची वर्गवारी लावली. लागवडीची व बिगरलागवडीची जमीन असे प्रामुख्याने दोन प्रकार केले. त्यात लागवडीखालील जमिनीत जिराईत व बागाईत फरक केला. जमिनीची अव्वल, दुम सीम आणि पडीक अशा ४ प्रकारे क्षमतेनुसार प्रतवारी लावली. उत्तम प्रतीची जमीन स्वराज्यात अल्प प्रमाणात होती. शेत मोजणीसाठी काठीचा वापर केला तिला 'शिवशाही काठी' म्हणत. काठी पाच हात व पाच मुठ लांबीची असे मोजमापाची काठी आंशी तनसुं लांब असे.

वीस काठ्यांचा एक पांड व वीस पांडाचा एक बिघा व एकसे वीस चौरस बिघ्याचा एक चावर होत असे. चावर नुसार संपूर्ण जमीन मोजून घेतली.

जमीन मोजणी अधिकाऱ्यास प्रत्येक गावास भेट देउन पाहणी करून गुणवत्तेनुसार प्रतीप्रमाणे वर्गवारी लावली जात असे. शेतकऱ्यांना नैसर्गिक व अनैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागे. अतिवर्षन, अवर्षनामुळे दुष्काळ पडत तर पेरणीच्या वेळी शत्रुचे आक्रमण झाले तर वर्ष रिकामे जाई. यातून पेरणी झाली आणि पीक काढणीस आले तर शत्रु उभी पिके कापून नेत यातून पिके वाचली तर उंदीर, जनावरे व पक्ष्यांच्या तावडीत सापडण्याची शेतकऱ्यांना भीती असे आणि एवढ्यातून जे उत्पन्न मिळे त्यामध्ये सरकारी शेतसारा वसुलीचे भूत शेतकऱ्यांच्या मानगुटीवर असे. एवढी दयनीय अवस्था शेतकऱ्यांची होत असे. म्हणून महाराजांनी शेतकऱ्याला मदतीचा हात देउन उभे करण्याचा वेगवेगळ्या पध्दतीने केला. या संदर्भात महाराज काय म्हणतात ते सभासद आपल्या बखरीत सांगतो.

**'नवी रयत येईल त्यास गुरेढोरे दयावी. बीजास दाणापैका दयावा. भक्षावयासि दाणापैका दयावा. तो ऐवज दोहों-चाहो वर्षानी आयुर्दाव पाडून उगवून दयावा. ये जातीचे रयतेचे पालग्रहण करावे'**

शेतसारा आकारणीत छत्रपतीनी क्रांतीकारी बदल केले. नगदी खरीप व रब्बी असे वर्गीकरण करून सारा आकारला जमीनीचा सारा म्हणून एकंदी उत्पनाच्या हिस्सा २/५ हिस्वा घ्यावा असे सांगितले. अतिशय अल्प प्रमाणात शेतसारा वसुल करून शेतकऱ्यांना महाराजांनी दिलासा दिला. त्यांनी महसुल वसुलीतील मिराजदारी बंद केली. शिवरायांनी ही सर्व पध्दत मुळासकट उपटून काढली. यामुळे रयत व सरकार यांच्यातील शेतकऱ्यांना गांजणारे दलाल नाहीसे करून शिवरायांनी राज्यकारभारात फार मोठी सुधारणा केली. 'गण समाजाच्या कुलमुख्याचा वारसदार पाटील होता तर ज्ञातृचा वारसदार देशमुख. गण समाजातले कुलमुख्य व ज्ञातृ ज्याप्रमाणे नष्ट होवु शकत नव्हते त्याप्रमाणे जाती समाजातले पाटील व देशमुख. त्याची महसुलीची मिरासदारी शिवाजीने नष्ट केली, वतनदारी नाही ही महान क्रांती नसली तरी क्रांती निश्चित होती'. सारा वसूलीतील दलालांची हाकालपट्टी करून वसुलीसाठी नवीन अधिकारी (सरकार कमाविसदार) नेमले. त्यांना सरकारी तिजोरीतून रोख पगार देण्याची पध्दत सुरू केली. त्याची महसूल प्रणाली ही वतनदारी स्वरूपाची नसून रयतदारी स्वरूपाची होती. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. याबरोबरच शेतकऱ्यांना वेगवेगळी मदत करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले.

**अधिकाऱ्यांनी कचेरीत बसून न राहता गावोगावी जावून शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या, शेतकऱ्यांना थकबाकीत सुट देणे, शेतकऱ्यांना बैलजोडी घेण्यासाठी अर्थ साहाय केले, शेती उपकरणासाठी सरकारकडून कर्ज देण्याची व्यवस्था कली, बी-बियाणासाठी सरकारकडून पैसे देण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले, दुष्काळ व शत्रु पक्षाकडून शेतकऱ्यांची लुट झाल्यास महसूल माफ केला, शेतकऱ्यांकडील बाकी त्यांच्या सोईनुसार वसूल करण्याचे आदेश दिले, पीक हातात येईपर्यंत उदरनिर्वाहासाठी पैसा, धान्य पुरविले जाई, नवीन जमीन लागवडीस प्रोत्साहन दिले, पिकांवर रोगराई झाल्यास महसुलात सवलत दिली, शेतकऱ्याच्या कर्तबगार मुलांना सैन्यात व शासनात सहभागी केले.**

अशा विविध आदेशान्वये महाराजांनी शेतकऱ्यांना मदत केली. 'जाणता राजा' होते. म्हणून शक्यतो ते शत्रुच्या भूमिवर लढाई लढण्याची खबरदारी घेत. यामुळे शेतीची होणारी नासधुस टाळता येत असे. शेतकऱ्यांच्या प्रश्नाची त्यांना जाणिव असल्याने शेतकऱ्यांना 'येका भाजीच्या देठालाही हात लावता कामा नये' अशी सक्त ताकीद लष्करास केली होती.

**सारांश** : छ.शिवाजी महाराज खऱ्या अर्थाने 'रयतेचे राजे' होते. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी त्यांनी नेहमी प्रयत्न केले. रयतेचे प्रश्न सोडविण्यासाठी वेळोवेळी अधिकाऱ्यांना पत्राद्वारे सक्त ताकिदी दिल्या. शेतकरी सरकारी जुलूम व शत्रुच्या कचाट्यातून वर निघाला पाहिजे ही त्या मागची प्रामाणिक भावना महाराजांची होती. शिवरायांच्या अतिशय काळजीपुर्वक आणि बारकाईच्या निरक्षणात्मक दृष्टीकोन असणाऱ्या धोरणांचा आदर्श आजच्या राज्यकर्त्यांनी घेणे गरजेचे आहे. आणिबाणीची वेळ येण्यापुर्वीच सावधगिरीचे उपाय शिवरायांनी योजीलेले होते. म्हणून त्यांच्या कालखंडात शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या नाहीत. आजच्या राज्यकर्त्यांनी शिवरायांच्या धोरणानुसार चालल्यास शेतकरी निदान आत्महत्या तरी करणार नाही. या चिंतनाची गरज आहे.

संदर्भ ग्रंथ :

१. शरद पाटील, शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याचे खरे शत्रु कोण, माळवाई प्रकाशन, पुणे पृ. ५३

२. प्रा. मा. म. देशमुख, शिवशाही, शिवभारती प्रकाशन, नागपुर पृ. ८२

३. प्रा. जैमिनी शारदा भाऊराव, कुणबी समाज, संघर्ष प्रकाशन, नागपुर पृ. ११

४. डॉ. मधुकर कुलकर्णी, अक्षर लेणी, मानसन्मान प्रकाशन, पुणे पृ. ४५

५. प्रा. गायकवाड, थोरात व चव्हाण, मराठी सत्तेचा विकास व ऱ्हास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे पृ. ३०५

६. J. Sarkar, Shivaji and his times, Orient longman Ltd., Delhi P. ३६६

७. श्रीमंत कोकाटे, १९ फेब्रुवारी २०१२, दै. देशोन्नती मधील लेख

८. श्रीमंत कोकाटे, १९ फेब्रुवारी २०११, दै. लोकमत मधील लेख

९. ॲड. अण्णासाहेब म्हळसणे, १९ फेब्रुवारी २०११, दै. सामना मधील लेख

१०. सेतु माधवराव पगडी, १९ फेब्रुवारी २०११, दै. एकमत मधील लेख

११. डॉ. अ. रा. कुलकर्णी, शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन पुणे, पृ. २१